# <u>वार्तापत्र</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय,
गडचिरोली. दिनांक

३/८/२०१८

## <u>पाच जहाल माओवाद्यांचे आत्मसमर्पण</u>

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेली आत्मसमर्पण योजना, माओवाद्यांना जनतेचे मिळत नसलेले पाठबळ वर्षभरात विविध चकमकीत माओवाद्यांचा झालेला खात्मा तसेच सततच्या भटकंतीच्या व हिंसाचाराच्या जीवनाला कंटाळुन, आतापर्यंत वरिष्ठ माओवादयांसह अनेक जहाल माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. सदर आत्मसमर्पित माओवाद्यांचे पोलीस दलाने पुनर्वसन घडवुन आणल्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील माओवादी मोठ्या संख्येने आत्मसमर्पण करीत आहेत. नुकतेच एकुण २० लाख रुपये बक्षिस असलेल्या ०५ जहाल माओवाद्यांनी मा. पोलीस अधिक्षक श्री शैलेश बलकवडे सो., मा. अपर पोलीस अधिक्षक महेंद्र पंडित सो., मा. अपर पोलीस अधिक्षक श्री हरी बालाजी सो. यांच्या समोर आत्मसमर्पण केले आहे. यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील माओवादी चळवळीला जबर हादरा बसला आहे. गडचिरोली पोलीसांनी माओवांदयाच्या विरोधात आतापर्यंत केलेली उत्कृष्ठ कामगिरी तसेच विकासाच्या विविध योजना राबवुन जनतेचा विश्वास संपादन केल्यामुळे माओवादी मोठ्या प्रमाणात आत्मसमर्पण करीत आहेत. खालील ०५ जहाल माओवाद्यांनी आज पोलीसांसमोर आत्मसमर्पण केले आहे.

१) **<u>साईनाथ ऊर्फ सत्तु चुक्कु पोदाळी</u>** - वय २६ वर्ष, हा माहे आक्टोबर २००९ ला कसनसुर दलममध्ये सदस्य पदावर भरती होऊन तो प्लाटुन क्र. ३ तसेच गट्टा दलम सदस्य म्हणुन कार्यरत होता. त्याचा एकुण ०६ पोलीस नक्षल चकमकीत सहभाग होता. तसेच त्याचेवर ०२ खुन , ०१ जाळपोळ केल्याचे गुन्हे दाखल आहेत. शासनाने त्याचेवर रुपये २ लाख बक्षिस जाहीर केले होते.

२) **<u>दिना ऊर्फ सन्नी मंगलु पुंगाटी</u>** - वय २० वर्ष, ही माहे नोव्हेंबर २०१४ ला जागुरगुडा (छ.ग.) दलम मध्ये भरती होऊन भामरागड दलम, गट्टा दलम मध्ये सदस्य म्हणुन कार्यरत होती. तिचा एका पोलीस नक्षल चकमकीत सहभाग होता. तसेच तिचेवर ०१ जाळपोळीचा गुन्हा दाखल आहे. शासनाने तिचेवर रुपये २ लाख बक्षिस जाहीर केले होते.

३) **<u>सुशिला ऊर्फ शिला ऊर्फ ज्योती ऊर्फ मदनी लक्ष्मण तलांडी</u>** वय २८ वर्ष, ही माहे जुन २००१ ला पेरमीली दलम मध्ये भरती होऊन २००३ मध्ये तिची बदली डिवीजन सि.एन.एम. टिममध्ये होवून त्यानंतर कपंनी क्र. १०, अहेरी एरीया सि.एन.एम. टिम, प्लाटुन क्र. १४ आणि

२०१२ पासुन इंद्रावती एल.ओ.एस. (छ.ग.) मध्ये ए.सि.एम. पदावर कार्यरत होती. तिचा एकुण १० पोलीस नक्षल चकमकीत सहभाग होता तसेच तिचेवर ०७ खुन व ०१ जाळपोळीचा गुन्हा दाखल आहे. शासनाने तिचेवर ६ लाख रुपयाचे बक्षिस जाहीर केले होते.

४) **राजेश ऊर्फ राजु याकुब कुजुर** - वय ३६ वर्ष हा माहे डिसेंबर २००६ ला कसनसुर दलममध्ये सदस्य पदावर भरती होऊन त्यानंतर कंपनी ४ मध्ये पीपीसीएम पदावर बढती होवून २०१० मध्ये दक्षीण डिवीजन डॉक्टर टिममध्ये बदली होवून सन २०११ पासुन कंपनी क्र. १० मध्ये पिपीसीएम पदावर कार्यरत होता. त्याचा एकुण १९ पोलीस नक्षल चकमकीत सहभाग होता. तसेच त्याचेवर ०२ खुन , ०१ जाळपोळ केल्याचे गुन्हे दाखल आहेत. शासनाने त्याचेवर रुपये ६ लाख बक्षिस जाहीर केले होते.

५) **मंगेश ऊर्फ विजय बाजु गावडे** - वय- ३२ वर्ष, हा माहे नोव्हेंबर २००९ ला पेरमीली दलममध्ये सदस्य पदावर भरती होऊन २०१० पासुन प्लाटुन क्र. १४ मध्ये पीपीसीएम पदावर कार्यरत होता. त्याचा एकुण १० पोलीस नक्षल चकमकीत सहभाग होता. तसेच त्याचेवर ०७ खुन , ०२ जाळपोळ केल्याचे गुन्हे दाखल आहेत. शासनाने त्याचेवर रुपये ४ लाख बक्षिस जाहीर केले होते.

आत्मसमर्पित माओवाद्यांपैकी २ महीला व ३ पुरुष असुन साईनाथ व दिना हे दोघे पती पत्नी आहेत. माओवादी चळवळीमुळे संपुर्ण भागाचा विकास खुंटलेला असल्याचे सांगुन यापुढे अहिंसेच्या मार्गाने जीवन जगण्याचा निर्धार आत्मसमर्पितांनी व्यक्त केला.

पोलीस विभागाने आत्मसमर्पण करण्याचे केलेले आवाहन व शासनाची आत्मसमर्पण योजना आणि पोलीस दलाने भुखंड, अर्थिक मदत, रोजगाराची उपलब्धता, नसबंदी रिओपनिंग यांसारख्या माध्यमातुन आत्मसमर्पितांचे पुनर्वसन घडवुन आणल्याने जानेवारी २०१७ पासुन आतापर्यंत एक कंपनी सदस्य, एक एरिया कमिटी सदस्यासह विविध दलमच्या तब्बल ४० माओवादयांनी आत्मसमर्पण केल्याने माओवादी चळवळीला जबर हादरा बसला आहे. आत्मसमर्पित लोकांच्या आत्मसमर्पणातुन प्रेरणा घेवुन लोकशाहीतील सन्मानाचे जीवन जगण्यासाठी दलममध्ये कार्यरत इतर सदस्यही नक्कीच आत्मसमर्पण करतील असा विश्वास मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली श्री शैलेश बलकवडे सो. यांनी दर्शविला आहे. यासोबतच माओवादयांनी पुकारलेल्या शहिद सप्ताहच्या अनुषंगाने पोलीस अधिक्षकांनी दलममध्ये कार्यरत माओवादी सदस्यांना आत्मसमर्पण करुन विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये येण्याचे आवाहन केले आहे.